महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित,
समाजश्री प्रशांतदादा हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
नामपूर ता. बागलाण जि. नाशिक

## १." विशेष नाविन्यपूर्ण उपक्रम "

**( Title of the Best Practice)**

## मराठी विभाग

## वर्ष – 2021-2022

# बागलाण प्रांतातील म्हणी, वाक्प्रचार, उखाणे संकलन व अभ्यास.

## 2.संकलनाचे उद्दीष्ट्ये व हेतु
## (Objectives of the Practice)

बागलाण हा महाराष्ट्रातील ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेला भौगोलिक पट्टा ( प्रांत) आहे. सदर प्रांत हा महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्याच्या उत्तरेला वसलेला आहे. मराठी या भागाची प्रमाणभाषा असून अहिराणी ही या प्रांतातील प्रमुख बोली आहे. जवळजवळ शेकडा ९०% लोक या बोलीतूनच आपला व्यवहार पूर्ण करतात. या प्रांताला लागून बाजूलाच गुजरात राज्य वसलेले आहे. गुजराती आणि मराठी यांच्या दोन्हींच्या समिश्रतेतुन अहिराणी या बोलीचा जन्म झाला असावा असे दिसते. अहिराणी बोली या परिसरातील प्रमुख बोली असून या बागलाण प्रांतातील अहिराणी बोलीतून ज्या म्हणी, वाक्प्रचार व उखाणे अस्तित्वात आहेत. त्यांचे संकलन अभ्यास विद्यार्थ्यांसमोर मांडावा. या भूमिकेतून अहिराणी बोलीतील म्हणी, वाक्प्रचार व उखाणे यांचे संकलन करण्याचा संकल्प मनात निश्चित केला. या निमित्ताने हा परिसर, समाज यांचाही विद्यार्थ्यांना चिकित्सक अवलोकन करता येईल. यातूनच समाजातील भाषिकसंस्कृती अनेकरंगी वैशिष्ट्यांचे ही विद्यार्थ्यांना दर्शन होईल. व अभ्यास करण्याची नवीन संधी या माध्यमातून त्यांच्यासमोर ही उभी राहिली यांचा निश्चित परिणाम विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात होऊ शकेल असा दृढ विश्वास वाटला. आणि याभूमिकेतून विद्यार्थीत्याना सोबत घेऊन हा संकल्प तडीस न्यायचे आम्ही ठरवले.

## 3.संकलन व अभ्यासाची गरज व हेतू :

## (The Context)

हे संकलन आणि अभ्यास यातून यावर सुद्धा प्रकाश पडेल अशी खात्री वाटली आणि उपक्रम निश्चितपणे यशस्वी करायचा या भावनेतून कामाला सुरुवात केली. या अभ्यासाच्या

निमित्ताने बागलाण प्रदेशातील स्थानिक लोकपरंपरांचा, लोक वाङ्मयाचा, मूल्यमापन, संचितांचा अभ्यास झाला पाहिजे. स्थानिक भूमीतील म्हणी व वाक्प्रयोग, वाक्प्रचार, उखाणे, कोडे, कुट, ब्रह्मोद, प्रहेलिका यांचा शोध घेऊन व्यापक संकलन करता आले पाहिजे. यातूनच स्थानिक लोकसंस्कृती विषयाचे आकलन विद्यार्थ्यांना अधिक स्पष्ट करून देता यावे. लोकसंस्कृतीतील हा ठेवा लिखित स्वरूपात नसतो. त्यामुळे बऱ्याचदा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होताना तो लुप्त होण्याची सुद्धा मोठी भीती असते. लोकसंस्कृतीतील हा खजिना अशा पद्धतीने लुप्त होऊ नये. त्याला निव्वळ अभ्यासापूर्वी न ठेवता लिखित स्वरूपात त्याला आणून लुप्त होण्याच्या भीतीतून त्याला वगळले पाहिजे असे अनेकदा मनात आले. आणि विद्यार्थ्यांना एकत्र करून हा ठेवा संचित संकलन करण्याचे काम सुरू केले. भाषेतील या म्हणी व वाक्प्रचार, वाक्यप्रयोग यांच्यातून लोकसंस्कृतीतील अनेक उदांत, निष्ठा, श्रद्धा आणि जीवनमूल्य व्यक्त होतात. बदलत्या पिढीनुसार समाज जीवनाबरोबर या सर्वांच्या आशाही बदलतात. तरीसुद्धा समाजाच्या विकासासाठी भाषेच्या दृष्टीने सुद्धा या म्हणी वाक्प्रकाराचे एक स्वतंत्र असे मूल्य आहे. ते मूल्य जतन करणे या भूमिकेतून हे काम सुरू केले.

बागलाण प्रांतातील लोकजीवनाचे भौतिक गरजा नुसार लोकांच्या प्रयत्नातून वेळोवेळी या म्हणी आणि वाक्प्रचार यांची निर्मिती झाली असेल. या सर्वांचे एकत्र संकलन करून परिसराचा हा भाषिक आणि सांस्कृतिक ठेवा एकत्रित विद्यार्थ्यांसमोर, समाजासमोर मांडला गेला पाहिजे. या भूमिकेतून या कामाचे महत्त्व निश्चित केले गेले. भाषा आणि भाषेतील ही वेगवेगळी आयुधे भाषेला आणि समाजाला समृद्ध करीत असतात. या संकलनातून, अभ्यासातून या संदर्भातील समृद्धीला लिखित स्वरूप दिले पाहिजे, अशी आवश्यकता वाटली आणि हे व्यापक

काम हाती घेतले. या माध्यमातून या भौगोलिक प्रांतातील रीतीरीवाज, परंपरा, संकेत, समजूती, रुढी, आचार-विचार, श्रधा, अंधश्रद्धा, सणउत्सव, आख्यायिका आणि म्हणी, वाक्प्रचार यांचा परस्पर संबंध कशा स्वरूपाचा असेल व यातून सांस्कृतिक भाषा आजतागायत कशी जिवंत राहिली असेल व भविष्यातील ती जिवंत राहील ही या प्रकल्पातून निश्चितपणे सांगता येते. या म्हणी, वाक्प्रचार यांच्यामध्ये वापरलेली यमक, अनुप्राय, दृष्टांत, अतिशयोक्ती, रूपक या अलंकाराबरोबरच विविध भावभावना, प्रतिमा, प्रतीके आणि मिथके यांची रेलचेल त्यांच्यामध्ये असल्याने वाक्प्रचार आणि म्हणी यांना वांडमयीन मूल्य प्राप्त होते हे घटक म्हणजे निव्वळ भाषिक, सामाजिक, सांस्कृतिक ठेवा नसून वांडमयाशी सुद्धा त्यांचा संबंध येतो.

## ४. प्रकल्प नियोजन

**( The Practice )**

प्रस्तुत प्रकल्प विद्यार्थ्यांकडून राबवताना बागलाण प्रांतातील सर्वदूर लांबवर पसरलेल्या अंदाजे ६०×६० मैलाच्या कार्यक्षेत्र विद्यार्थ्यांना गावोगावी, वाड्यावर, पाडयावर पाठविणे आवश्यक होते.कारण हे म्हणी, वाक्प्रचार, वाक्यप्रयोग यांचे मराठी भाषेतील आणि अहिराणी बोलीतील हे संचित ह्या भागातूनच उपलब्ध होणार होते.हा भ्रमंती, प्रवास लोकांच्या भेटी यातूनच लोकांकडून माहिती होणे ज्या व्यक्तीकडे हे ज्ञान आहे ही माहिती आहे. अशाचा अगोदर तपास घेणे. आपण जे काम करीत आहोत या संदर्भातील भूमिका त्यांना समजावून सांगणे त्यांचा विश्वास संपादन करणे याकामासंदर्भात त्यांचा मूड तयार करणे व त्यांच्याकडची माहितीसंवादातून समजावून घेणे ती लिहून घेणे अशा सारासर फाफट पसारा असलेले हे काम अती भयानक स्वरूपाचे दिलेलं होतं. या संदर्भात सुरुवातीला विद्यार्थ्यांनाच तयार

करणे हे अतिशय कठीण काम होत त्यामुळे ७ ते ८ दिवस महाविद्यालयात या संदर्भात मराठी विभागाकडून प्रथमतः विद्यार्थ्यांना प्रशिक्षित कसे करता येईल यासंदर्भात एक विशेष उपक्रम राबविला गेला. हा उपक्रम राबविताना अनेक अडचणी आल्या या संदर्भात सुरुवातीला १०० मुलांची निवड करण्यात आली.प्रशिक्षण वर्गाच्या दुसऱ्या तिसऱ्या वर्गाची यातील बरीचशी मुलं गायब झाली आणि मग पुन्हा नवीन विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांची मानसिक तयारी उपक्रमासाठी तयार करणे यातून प्रशिक्षण वर्गाच्या अखेरपर्यंत तरीसुद्धा विद्यार्थ्यांची गळती कायम राहिली तरीही प्रयत्न सोडला नाही. उपक्रम राबवायचेच अशी पक्की धारणा समन्वयक व मराठी विभाग प्रमुख प्राध्यापक सुनिल जाधव यांनी निश्चित केली होती. अखेरीस संबंधित प्रशिक्षण वर्गातून १०६ विद्यार्थ्यांना या संदर्भात विशेष प्रशिक्षण देण्यास आम्ही पूर्णतः यशस्वी ठरलो.या उपक्रमाचा पहिला टप्पा अशा रीतीने पूर्ण केल्याने दुसऱ्या टप्प्याला सुरुवात केली गेली. दुसऱ्या टप्प्यात या सर्व १०६प्रशिक्षणार्थींना दूरवर फिल्डवर प्रत्यक्षात पाठवण्याचे नियोजन आखण्यात आले. या नियोजनात प्रत्येक विद्यार्थी कुठल्या भागात जायचे, कुठल्या गावात जायचे अथवा कुठल्या वाडीवर, पाड्यावर जायचे या संदर्भातले नियोजन करण्यात आखले गेले. गावचे नाव,अंतर, गावात गावकऱ्यांना कसे भेटायचे, माहिती कशी मिळवायची आणि काम फत्ते कसे करायचे या संदर्भात कामाला सुरुवात झाली.अंदाजे १२ ते १५ दिवस हे काम चालू होते. काही ठिकाणी दो, तीन,चार अशाही चकरा माराव्या लागल्यात यातूनच सुरुवातीच्या पहिल्या ७ ते ८ दिवसात बऱ्यापैकी माहिती मिळू लागली. यामुळे कामासंदर्भात विश्वास मिळू लागला. यातूनच काम करणारे विद्यार्थ्यांच्या तुकडीचे मनोधैर्य वाढीस

लागले आणि संकल्पना शेवटच्या टप्प्यात यायला लागली या संदर्भात प्रत्येक विद्यार्थ्याला साधारणपणे १० ते १५ म्हणी, वाक्यप्रयोग, वाक्यप्रचार, शब्दप्रयोगाचे संकलन करावे असे उद्दिष्ट निश्चित केले होते. हा आकडा पूर्ण करण्यात बऱ्याचदा अडचणी येतील. वेळप्रसंगी एका व्यक्तीकडून एखादीच म्हणी उपलब्ध व्हायची त्यांच्याकडून असे समजायचे दुसऱ्या वस्तीवर अमुक अमुक ठिकाणी माहिती मिळेल मग पुन्हा दुसरी, तिसरी, चौथी वेळप्रसंगी पाचवी वस्त्यांचा, वाड्यांचा, पाड्यांचा प्रवास माहितीगारांचा शोध आणि काम पूर्ण करायचा असा निग्रह यातून संकलन शेवटच्या टप्प्यात आले. संकलनात खूप अडचणी आल्यात. माहितीगारांकडून माहिती न मिळणे माहितीगारांचा अविश्वास तयार होणे, माहितीगारांचा मूड बरोबर नसणे व यामुळे माहितीगारायला ऐकू न येणे. वयामुळे शब्द उच्चारलेला न समजणे तो जेवण करत असेल, विश्रांती करत असेल अशा वेळी ताटकळत राहिणे, संबंधित ठिकाणापर्यंत पोहोचताना रस्ता नसल्याने पायी रस्त्याने निश्चित ठिकाणी पोहोचणे अशा व इतरही अनेक अडचणींना सामोरे जावे लागले.

भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेत असे प्रकल्प वेगवेगळ्या स्तरावर उदा: भाषिक, सामाजिक, आर्थिक, वाङ्मयीन, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक, ऐतिहासिक अशा अनेक अंगावर, विषयांवर विद्यालय महाविद्यालयातून विद्यार्थ्यांकडून निश्चितपणे राबवता येऊ शकतात . वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय व इतरही अनेक शाखांमधून असे विशेष प्रकल्प विद्यार्थ्यांकडून निश्चितपणे राबविता येऊ शकतात. यातूनच संबंधित विषयातून माहितीचा प्रचंड खजिना देशासाठी उपलब्ध होऊ शकतो याचे फायदे शब्दातून व्यक्त करणे कठीण आहे् परंतु निश्चितपणे उच्च शिक्षणासाठी

याविशेष उपक्रमाचा आग्रह धरला पाहिजे असे वाटते विद्यार्थ्यांकडून असे प्रकल्प राबविण्यास संबंधित विषयातील विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक ज्ञान यामुळे खूप प्रचंड प्रमाणात वाढू शकते. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढू शकतो असे प्रकल्प राबविले गेल्यास बरीचशी मैदान पातळीवरील माहिती उघडकीस येऊ शकते या माहितीचा व ज्ञानाचा खूप मोठा उपयोग देशाला वरील सर्व विषयांच्या बाबतीत होऊ शकतो अशी माहिती मिळविल्याने विद्यार्थ्यांच्या विशेष ज्ञानात भर तर पडेलच शिवाय हळूहळू काळाच्या ओघात हे जे विविध विषयातील संचित लुप्त होण्याच्या धोकाही कमी होतो.

**५. प्रकल्पाची यशस्विता**

**( Evidence of Success )**

प्रस्तुत विशेष उपक्रमात महाविद्यालयातील वेगवेगळ्या शाखेमधील १०६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सदर विद्यार्थ्यांचा महाविद्यालयात एक उजळणी वर्ग आयोजित केला गेला. या उजळणी वर्गाद्वारे या विद्यार्थ्यांना उपक्रमासंदर्भात सर्व पातळीवर तयार करण्यात आले यातून प्रत्येक विद्यार्थ्याला विशिष्ट परिसर निवडीचे अधिकार दिले. या संदर्भात विद्यार्थ्यांचे व गावनिहाय एक स्वातंत्र्य तक्ता तयार

करण्यात आला. या विशिष्ट उपक्रमासाठी २०२१ या शैक्षणिक वर्षातील फेब्रुवारी या महिन्याची निवड करण्यात आली. यानंतर प्रत्यक्ष फिल्डवर दिनांक ८ फेब्रुवारी वार सोमवारपासून कामाला सुरुवात करण्यात आली.दोन रविवारी व शिवजयंतीची सुट्टी वगळता सलग १४ दिवस म्हणजेच दिनांक २४ फेब्रुवारी २०२१ पर्यंत फील्ड वरचे हे कामकाज नित्य नेमाने आखून दिलेल्या वेळापत्रात सुरू होते. कामकाजाच्या नियोजनाच्या पहिल्याटप्प्यात ४० गावाहून माहिती मिळवणे अडचण आली. यानंतर पुन्हा पुन्हा प्रयत्न करून अंदाजे १५ ठिकाणाहून माहिती मिळाली. २५ गावाहून माहिती मिळवणे कठीण वाटू लागल्याने दुसऱ्या पर्यायी गावाचा विचार करून तेथे विद्यार्थ्यांना पाठवण्यात आले. यातून २२ गावाहून व्यवस्थित माहिती मिळाली. पुन्हा ३ गावा हून अडचणी आल्या. विशेष प्रयत्न करून २ ठिकाणाहून माहिती मिळाली. पुन्हा एका वस्तीचा शोध घेऊन अखेर त्यावस्तीवर माहिती मिळवण्यास यश आले. अशा रीतीने १६० विद्यार्थ्यांनी परिसरातील वेगवेगळ्या गाव, वाडी, वस्ती, पाढे यावर जाऊन जवळपास १०५० ते १०६० अशा वेगवेगळ्या म्हणी, वाक्प्रचार, वाक्यप्रयोग यांची माहिती मिळवली प्रत्यक्षात १६४० म्हणी, वाक्प्रयोग, वाक्प्रचार यांची माहिती प्रथमता उपलब्ध झाली होती. परंतु यामध्ये ५९० ते ६०० म्हणी,वाक्यप्रयोग, वाक्प्रचार यांची पुनरावृत्ती होत आहे असे लक्षात आले पुनरावृत्ती झालेले ६०० वाक्यप्रयोग, म्हणी, वाक्प्रचार काढून टाकण्यात आले हे सर्व संकलन विद्यार्थी निहाय होते. महाविद्यालयातील द्वितीय वर्ष वाणिज्य वर्गातील विद्यार्थीनी कुमारी अहिरे पूजा कडुन तिच्या अतिशय सुंदर आणि स्वच्छ अक्षरात पूर्ण करण्यात आले.

## ६. प्रकल्पातील प्रश्न, समस्या आणि उपाययोजना.

**(Problems Encountred and Required)**

प्रस्तुत नाविन्यपूर्ण प्रकल्प राबवित असताना पहिली अडचण विद्यार्थ्यांच्या निवड प्रक्रियेतून आली. या प्रकल्प उपक्रमासाठी ज्या भौगोलिक पट्ट्याची निवड करण्यात आली होती. त्यात अंदाजे १४० ते १५० गाव, वाडी,वस्ती, पाढे यांचा समावेश होता. अशावेळी प्रत्येक गावासाठी एक स्वातंत्र्य विद्यार्थी मिळणे महत्त्वाचे होते. यातूनच १५० विद्यार्थ्यांना हे काम सोपवण्यात सोपवावे अशी योजना तयार करण्यात आली. या संदर्भात १५० विद्यार्थी निवडून त्यांना प्रशिक्षित करण्याचे काम सुरू झाले. यामध्ये ४४ विद्यार्थ्यांची शेवटच्या दिवसापर्यंत गळती झाली त्यामुळे मूळ उपक्रम १०६ विद्यार्थी सहभागी होऊ शकले. हा आकडा वाढविण्याचा प्रयत्न केला परंतु त्यात यश आले नाही. अखेर १०६ विद्यार्थ्यांकडून हे काम करण्याची निश्चित झाले. प्रत्यक्षात फिल्डवरचे काम सुरू झाल्यानंतर योग्य माहिती न मिळणे संबंधित व्यक्तीकडून माहिती देण्यास टाळाटाळ होणे, अर्धवट माहिती मिळणे, विशिष्ट वेळेतच माहिती मिळेल अशा हट्ट माहिती देणाऱ्या कडून होणे, माहितीच्या प्रयत्नांना राग येऊन गैरसमज होणे, माहितीसंदर्भात आवश्यकतेचा आग्रह धरणे,

माहिती देणारा आजारी असणे त्याचे वय झालेले असल्यामुळे त्याला ऐकू न जाणे त्याचा शब्द उच्चार समजणं यावर अशा अनेक अडचणी प्रश्न माहिती घेताना येत होते परंतु यावर त्यांना सहजपणे माहितीचा फायदा पुढील अनेक विद्यार्थ्यांना होणार आहे हे पटवून सांगणे. लिखित स्वरूपात संकलन करायची आहे याची खात्री देणे व आपल्या माहितीचा समाजाला खूप उपयोग फायदा होणार आहे. यावर अशा अनेक क्लूप्त्या लढवून सदरहून माहिती गोळा करण्यात प्रयत्न झाला.

## ७. उपक्रम सर्वदूर राबविण्या संदर्भात

**Notes (Optional)**

प्रस्तुत उपक्रम हा निश्चितपणे सर्व दूर उच्च शिक्षणात पूर्ण राज्यामध्ये महाराष्ट्रमध्ये सर्वच विद्याशाखां मधून प्रत्येक विषयात राबवता येऊ शकतो अशा विश्वास वाटतो. असं झाल्यास विविध विद्याशाखांमध्ये विषयातील अतिशय सखोल आणि व्यापक माहितीचे भांडार यांचे संकलन करता येऊ शकते. या संकलनातून या माहितीचे विश्लेषण विश्लेषणातून येणारे निष्कर्ष आणि त्या निष्कर्षाचा समाजाला खूप मोठा फायदा होऊ शकेल. जसे दूध आंबविलेले त्याची दही होते. दह्यापासून लोणी करता येऊ शकते लोणीपासून तूप हा ताकदीचा पदार्थ तयार होऊ शकतो. अगदी तसेच विविध विषयांमध्ये संकलन करून त्या संदर्भात विशेष अभ्यास करून निश्चितपणे अनेक प्रकारची माहिती, ज्ञान यातून बाहेर येऊ शकते. प्राचीन, ऐतिहासिक लुप्त होत जाणाऱ्या अनेक गोष्टी, अनेक वर्ष जिवंत ठेवता येऊ शकतात. यासर्व अभ्यासातून विद्यार्थ्यांची नैतिक, आध्यात्मिक शास्त्रीय बाजू भक्कम होण्यास मदत होऊ शकते. त्याचबरोबर समाजाची तात्विक, वैचारिक, मूल्यवादी विचारसरणी सुद्धा बदलू शकते. असा संकलन व त्याच्या अभ्यासामुळे बदलू शकते असा विश्वास वाटतो.